01
23-24

Sonpeth Dist.Parbhani

ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - XII Issue - I November - April - 2023-24

English / Marathi Part - I

**Peer Reviewed Refereed and**
**UGC Listed Journal No. 47023**

**Single Blind Review / Double Blind Review**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2023 - 7.878
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

VOLUME - XII, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2023-24
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 7.878 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ११ | स्पिनोझा व लायब्निझच्या द्रव्याचे स्वरुप<br>**डॉ. सुनिल काळमेघ** | ५४-५८ |
| १२ | शेतकऱ्यांना कृषी व्यवसायात रोजगाराच्या संधी<br>**प्रा. डॉ. बी. आर. शिंदे** | ५९-६१ |
| १३ | बंजारा समाजाचा इतिहास व संस्कृती : एक अभ्यास<br>**डॉ. बंडू थावरा पवार** | ६२-६७ |
| १४ | शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांनी केलेल्या शैक्षणिक चित्रपट परीक्षणांचा अभ्यास<br>**डॉ. बी.जी. खाडे** | ६७-७३ |
| १५ | अहमदनगर जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात सेवांतर्गत प्रशिक्षण यंत्रणांच्या YCMOU नाशिक व MSCERT कार्याचा व प्रभावांचा अभ्यास<br>**डॉ. कुमावत अमरनाथ शांताराम** | ७४-७८ |
| १६ | स्त्रीभ्रूणहत्या : समाजाच्या अस्तित्वावरील संकट<br>**डॉ. मुसळे आनंद रामदास** | ७९-८६ |
| १७ | कर्नाटक विधानसभा निवडणूक निकालांचा राज्यातील लोकसभा निवडणूक निकालांवर झालेला परिणाम : एक अभ्यास<br>**डॉ. प्रदीप बस्वराज पाटील** | ८७-९० |


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

VOLUME - XII, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2023-24
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 7.878 (www.sjifactor.com)

# १२. शेतकऱ्यांना कृषी व्यवसायात रोजगाराच्या संधी

**प्रा. डॉ. बी. आर. शिंदे**
वाणिज्य विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि., परभणी.

**प्रस्तावना**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतीय शेती पारंपारीक असुन ती निसर्गावर अवलंबून आहे. भारतीय शेतीत कधी ओल दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ पडतो. म्हणून असे म्हणतात भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात वावरतो, आणि कर्जातच मारतो. परंतू अलीकडील काळात भारत सरकार शेतीचे व्यावसायीकीकरण करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतू त्यांना त्यात फारशे यश मिळत नाही. शेतीचे व्यवसायीकरण करणे भाराताचीच नाहीतर जागतीक संकल्पना बनली आहे. या संकल्पनेतूनच कृषी पर्यटन ह संकल्पना समोर आली आहे. पर्यटन आणि शेती याचा विकसीत होताना दिसतात. उदा. जर्मनी, ब्राझील, फ्रान्स, याला भारत ह अपवाद राहिलेला नाही. कारण शेतीचा विकास आणि सुशिक्षित बेकाराच्या हाताला काम या व्यासायातून मोठ्या प्रमाणात मिळ आहे. म्हणून भारतात 2004 साली महाराष्ट्रातील बारामती मधून कृषी पर्यटन या व्यवसायाची सुरुवात झालेली चळवळ पुर्ण देशा रुजलेली दिसते.

**कृषी पर्यटनाचे महत्व - (Important of Agri Tourism )**

कृषी पर्यटन हा व्यवसाय भारताच्या ग्रामीण आणि शहरी भागाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. कारण अलीकडील काल मोठ्या प्रमाणात शहरी कारण होत आहे. शहरी करणामुळे ग्रामीण संस्कृती लोप पावत असून, मानवी जिवन गतीमान होवून गुंतागुंतीचे बनत चालले आहे. पुर्वी भारतात शेती हा व्यवसाय प्रमुख होता. शेती हे भारतीय लोकांचे उदरनिर्वाह चे साधन म्ह पहिले जात असे. परंतू औधोगिकीकरण आणि वाढते शहरी करण यामुळे सर्वच क्षेत्रात अमुलाग्र बदल झाला. त्यामुळे शेतीकडे अ उदरनिर्वाहचे साधन म्हणून नपाहता एक व्यवसाय म्हणून पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यातूनच जगात कृषी पर्यटन हा पुढे आला. "एक ही सदे सब सदे" या युक्ती प्रमाणे कृषी पर्यटनातून शेती विकास आणि शेती व्यवसाय ही संकल्पना विक करण्यास मदत झाली म्हणून कृषी पर्यटन व्यवसायाचे महत्व वाढले आहे.

कृषी पर्यटनामुळे ग्रामीण आणि शहरी लोकांना जोडणारा एक मार्ग निर्माण झाला आहे. शहरी भागातील लोकांचे जिव धावपळीचे निर्माण झाले आहे. त्यांना कामकरून थकवा आल्या नंतर एक विसावा म्हणून कृषी पर्यटन महत्वाचे केंद्र बनले आहे केंद्रात त्याचा थकवा जावा म्हणून मनोरंजनाच्या सोयी असतात, ग्रामीण जेवनाचा तडाका, चुलीवरच्या भाकरी, लहान मु खेळण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची खेळणी, पोहण्यासाठी स्विमिंग टँक, शेती मध्ये पर्यटकांसाठी गार्डन, कृषी पर्यटनामध्ये करण्यासाठी बैल गाडी, घोडा, गायी, म्हसी, शेळीपालन, कुकूट पालन, पर्यटन स्थळी मुक्काम करणाऱ्या नैसर्गिक निवासाची व्य

स्त्रियांना किंवा मुलांना सुरक्षितता, पर्यटकांना शेती व्यवसाया विषयी ज्ञान, यामुळे सर्व कुटुंब आपला तान तणाव विसरून त्या ठिकाणी तणाव मुक्त व आनंदी जीवन जगतात त्याचा परिणाम पुन्हा तेथून घरी परतल्या नंतर आपल्या दैनंदिन कामाला गतीने लागतात म्हणून कृषी पर्यटन व्यवसाय आजच्या काळात महत्व पुर्ण आहे.

कृषी पर्यटन या व्यवसायासाठी कमीत कमी एक हेक्टर व जास्तीत जास्त चार एकर जमीन लागते. एक हेक्टर च्या जागेतील कृषी पर्यटनात 10 ते 20 लोकांचा रोजगार निर्माण होतो. तर चार हेक्टर जागेतील कृषी पर्यटनात 70 ते 80 लोकांचा रोजगार निर्माण होतो. या व्यवसायामुळे शेतीचा विकास व बेकार युवकांना रोजगार मिळतो. त्यामुळे हा व्यवसाय शेतकऱ्या बरोबर सरकारला शुद्धा महत्त्वपूर्ण आहे. म्हणून या व्यवसायाचे महत्त्व वाढले आहे.

कृषी पर्यटन या व्यवसायामुळे शेतकऱ्याला आर्थिक संपन्नता मिळते. त्यामुळे शेतकरी व या व्यवसायात ज्या ज्या व्यक्तीला रोजगार मिळाला आहे. या सर्व लोकांची आर्थिक उन्नती होते. त्यामुळे त्याच्या आर्थिक प्रश्न सुटतात. शेतकरी आणि कामगार किंवा कर्मचारी याचे आर्थिक उत्पन्न वाढल्यामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारतो त्यामुळे शेतकरी आणि कर्मचारी यांची सामाजीक प्रतिष्ठा वाढते. त्यामुळे कृषी पर्यटन हा व्यवसाय आज महत्त्वपूर्ण आहे.

**कृषी पर्यटन व्यावसाय समोरील समस्या (Problems Facing the Agri-tourism Industry)**

कृषी पर्यटन हा व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वाची भुमिका पार पाडतो. या व्यवसायापासून शेतकऱ्यांना अनेक फायदे मिळतात. तरी पण या व्यवसायातील काही समस्या सुद्धा आहेत. हा व्यवसाय करताना काही समस्या विचारात घेणे आवश्यक आहे. त्या समस्या खालील प्रमाणे आहेत.

**1. अप्रशिक्षित शेतकरी वर्ग**

भारतीय शेतकरी ग्रामीण भागात राहत असून तो पारंपारिक पद्धतीने शेती करतो. त्यामुळे भारतीय शेतकरी प्रशिक्षित नाहीत, म्हणजे त्याच्याकडे शेती पर्यटन व्यवसाया विषयी ज्ञानाचे प्रमाण कमी, त्यामुळे त्यांना कृषी पर्यटन व्यवसाय कसा करावा यावर मर्यादा येतात. त्याचा परिणाम व्यवसायावर होतो.

**2. संभाषण कौशल्याचा अभाव**

कृषी पर्यटन या व्यवसायात ग्रामीण भागातील ग्राहकांपेक्षा शहरी ग्राहक जास्तीचे आहेत. आणि शहरी भागातील संस्कृती ग्रामीण संस्कृती पेक्षा वेगळी आहे. त्यामुळे कृषी पर्यटक आणि कृषी पर्यटक शेतकरी यांच्या संभाषण कौशल्यात फरक पडतो त्याचा परिणाम व्यवसायावर होण्याची शक्यता असते.

**3. भांडवलाचा अभाव**

व्यवसाय कोणत्याही प्रकारचा असला तरी म्हणजेच ग्रामीण असो किंवा शहरी असो त्या व्यवसायाला मोठ्या प्रमाणा भांडवलाची गरज भासते. कृषी पर्यटन हा व्यवसाय ग्रामीण असला तरी या व्यवसायाला भांडवलाची आवश्यकता आहे. कारण य व्यवसायाची संकल्पना वेगळी आहे. या व्यवसायात ग्राहक शहरी व संस्कृती ग्रामीण दाखवण्यात येते. ही संस्कृती पुर्ण दाखवण्यासा

भांडवलाची आवश्यकता असते. या व्यवसायात शेतीचा विकास, रस्ते, सुरक्षा, पोहण्यासाठी स्विमिंग टँक, फळाची झाडे, भाजीपाला व हुरडा शेतीत राहण्यासाठी नैसर्गिक निवासस्थाने, स्त्री विषयक सुरक्षा आणि सुविधा लहान मुलांची खेळणी, अशा वेगवेगळ्या सुविधा निर्माण करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. एक हेक्टर मध्ये व्यवसाय उभा करावयाचा असल्यास 15 ते व 20 लाख भांडवलाची आवश्यकता असते. आणि दोन ते चार हेक्टर मध्ये हा व्यवसाय उभा करावयाचा असेल तर कमीत कमी 70 ते 80 लाखाची आवश्यकता असते. परंतु ग्रामीण लोकांकडे भांडवलाचा अभव असतो. त्यामुळे हे व्यवसायीक पुर्ण सोयी उपलब्ध करू शकत नाहीत. त्याचा परिणाम व्यवसायावर होतो.

**4. आवडी निवडी व फॅशन**

कृषी पर्यटन हा व्यवसाय ग्रामीण आहे. परंतु या व्यवसायांना असणारे ग्राहक शहरी आहेत. शहरी भागातील कृषी पर्यटक आणि ग्रामीण कृषी पर्यटक व्यवसायिक या दोन्हीच्या संस्कृतीमध्ये मोठा फरक आहे. म्हणजेच शहरी भागातील पर्यटकांच्या आवडी निवडी नुसार त्यांना सेवा पुरवल्या पाहिजे. परंतू कृषी पर्यटक हे व्यावसायिक ग्रामीण असल्यामुळे त्यांना कृषी पर्यटकांच्या आवडी निवडी फॅशन याविषयी ज्ञान असेलच असे सांगता येत नाही. त्याचा परिणाम व्यवसाय उद्योगावर होऊ शकतो.

**5. असंघटीत व्यवसाय**

कृषी पर्यटन हा व्यवसाय ग्रामीण असून तो असंघटीत आहे. त्यामुळे या व्यवसायाच्या विकासासाठी सरकारकडून वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणी करून घेणे असख्य आहे. म्हणून आज जरी या व्यवसायामधुन शेतकऱ्यांना व तरुणांना रोजगार मिळत असला तरी, भविष्यात असे व्यवसाय अडचणीत आल्यास त्यावर मार्ग काढणे अशक्य आहे.

**निष्कर्ष**

कृषी पर्यटन हा व्यवसाय शेतकऱ्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे कारण आज शेती करणे शेतकऱ्यांसाठी अडचणीचे आहे. म्हणून आज शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहणे आवश्यक आहे. गेल्या दोन दशकापासुन कृषी पर्यटन ही संकल्पना पुढे आली, कृषी पर्यटनामुळे शेतीचे व्यवसायीकरण व युवकांना रोजगार अशा दोन्ही गोष्टी साध्य होत आहेत. म्हणजेच या व्यवसायातून शेतकरी आणि सरकार या दोन्ही घटकांचा उद्देश साध्य होत आहे. आणि ग्राहकांना सुद्धा समाधान कारक सुविधा मिळतात परंतू हा व्यवसाय असाच टिकूण राहणे व या व्यवसायाचा विकासासाठी सरकारने पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ**

1. ग्रामीण अर्थशास्त्र प्रा. नानासाहेब पटनुरे व प्रा. डॉ. मनोजकुमार सोमवंशी.
2. कृषी अर्थ -शास्त्र डॉ.जे.प्रकाश मिश्रा.
3. ग्रामीण अर्थ -व्यवस्था डॉ. बी. एल. मातूर.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani